शरदिनी महाडेश्वर

# मृगया

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२६८



REFBK-0020828
REFBK-0020828

प्रकाशक : वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन,
५३ गुरु नानक मार्केट,
डॉ. आंबेडकर रोड, दादर,
मुंबई १४

प्रथमावृत्ती : जून १९७५

© सौ. शरदिनी महाडेश्वर
ए / ६३ श्रमसाफल्य,
शिंपोली, बोरिवली (पश्चिम)
मुंबई ९२

मुखपृष्ठ : प्रकाश विश्वासराव

मुद्रक : अनंत वि. जोशी
साहित्य मुद्रणालय,
१२६३ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

# शरदिनीची स्वप्नकविता

८८२८
३१२५

रोजच्या व्यवहारी जीवनापलिकडे असतं कवीचं एक भावजीवन. रखरखीत वाळवंटात दूर दूर चमकणाऱ्या आणि मुळात नसणाऱ्याच मृगजळासारखं. एकाच वेळी खरं आणि खोटंही. मनामध्ये भावनांची वादळं उठतात. वातचक्रासारखी ती मनाला भणभण फिरवतात. कधी कधी आणि बहुधा नेहमीच – हाती असं काहीच लागत नाही. पण हाती काही लागावं ह्यासाठी कवीचं मन रणरणत नसतंच. पण जे काहीच नाही, ते एक अंतिम सत्य मानून त्या दिशेनं सदैव उत्तुंग उड्डाण करायचं हा कविमनाचा ध्यास. तेच त्याचं अस्तित्व. हाती काय लागेल ते व्यवहारी जगानं हिशोबी वृत्तीत ठरवावं. पण कविमनाला आभासाचे तरल सौंदर्य पुरेसे वाटते. कुणी म्हणेल, जर स्वप्ने खरी होणारच नसतील तर मग स्वप्नांचा हव्यास का ? त्यासाठी शब्दांची उधळपट्टी का ? स्वप्नांमागे का होईना पण उंच जाता येतं. कविमन उंच पोचू शकतं हेच खरं महत्त्वाचं. शरदिनी महाडेश्वर ह्यांच्या तरल भावकविता वाचताना माझ्या मनात हेच विचार निर्माण झाले. जगाच्या दृष्टीनं ज्याला काहीच महत्व नाही अशा एका एका हळुवार क्षणांचा पाठलाग ही कवयित्री सारखी करते आहे. ते क्षण जरा हाती लागताच भावोत्कटतेचे दिव्य सौंदर्य अनुभवते आहे आणि मग त्या हळुवार क्षणांना तितक्याच हळुवार शब्दात उतरवण्यासाठी तळमळते आहे. जगाच्या दृष्टीनं ह्या क्षणांना काहीच किंमत नसेल. पण ती मात्र भावभावनांचं एक अद्भूत नाटच त्या क्षणात जगते आहे. अशा हळुवार क्षणांच्या अनुभूतीसाठी तिचं मन सदैव उत्सुक आहे. निसर्गाच्या सान्निध्यात तिला त्या हळुवारतेचा, दिव्य कोमलतेचा साक्षात्कार होतो. निसर्गापाशी कधी ती एकाकी भावनांचे उद्रेक अनुभवते. तर कधी कधी मनाची गूढ स्तब्धताही तिला जाणवून जाते.

वादळी वाऱ्यात
हिंदकळून जाणाऱ्या झाडाखाली
नकोच ते उभं राहणं
आधारासाठी

ह्या चारच ओळीत, हिंदकळून जाणाऱ्या झाडाखाली, ह्या शब्दवतच तिच्या मनाची अस्वस्थता, त्या मनातली प्रतीक्षा व्यक्त होते.

मातीचा उत्कट लाल रंग
गवताची गर्दगार हिरवळ
उन्हाचा उबदार सोस
फुलांचे निःशब्द निमंत्रण
हे सारे नाकारणे
केवळ अशक्य अशक्य

एका एका निसर्ग चित्रात मनाचं एकेक सूक्ष्म आंदोलन तिनं सूचकतेने प्रगट केलं आहे. माती, गवत, उन्ह, फूल ह्या चारही प्रतीकातून तिच्या भावनेचा गाढपणा आणि त्या भावनेतलं अव्यक्त सौंदर्य व्यक्त झालं आहे.

तर

पसरल्या आहेत धुक्याच्या लाटा
क्षितिज रेखेवर अस्ताव्यस्तपणे

ह्या कवितेतून मनाचं अकस्मातपणे जाणवणारं मौन धुक्याच्या आणि गारव्याच्या प्रतीकातून जाणवून दिल आहे.

कवयित्रीतील प्रेयसी जगाकडे – निसर्गाकडे बघते तेव्हा तिच्या अंत:करणात दाटून आलेली एक अनामिक व्याकुळता तिच्या सर्व अनुभवांना नकळतच एक उदास – रमणीय छटा देऊन जाते. प्रेम म्हणजेच शरीरातून जाणवणारं पण मुळात अशरीरी असलेलं एक अतिगूढ पातळीवरील अस्तित्व. प्रेमाचा खरा उन्माद भेटीत नाही, तर भेटीसाठी तळमळण्यात, मीलनात नाही, तर मीलनापूर्वीच्या विरहात असतो. त्या दुराव्यातच प्रीतीच्या गूढ अस्तित्वाचा साक्षात्कार होतो. श्रीकृष्णाची भेट मिळण्याची आशा नसूनही केवळ त्या भेटीच्या नुसत्या ओढीवरच जिवंत झालेल्या मीरेलाच फक्त प्रीतीच्या त्या गूढ स्वरूपाचा साक्षात्कार होऊ शकतो.

कवयित्रीला प्रीतीच्या त्या गूढ स्वरुपाच्या भिन्नविभिन्न छटा प्रतीत झालेल्या तिच्या कविमनातून निश्चितपणे जाणवतात.

तेव्हापासून आसू असे वहात आहेत

... ... ... ... ... ... ... ... ... ...

... ... ... ... ... ... ... ... ... ...

कविता माझी तुझ्यामागून वणवण फिरते

ह्या कवितेतून, किंवा

हवे तेव्हा नाही येत निळे आभाळ भरून

.. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

थोड्या थोड्या भुईसाठी पायपीट ही चालली

ह्या कवितेतून प्रीतीच्या अशा दिव्य आभासांसाठी उत्सुकलेली, आपल्या पाकळ्या हलके हलके उलगडणारी, पहाटेच्या दवबिंदूची उत्सुक होऊन वाट पहाणारी तिच्यातली सुकुमार कळी अचानक सापडते. शरदिनी महाडेश्वर ह्यांनी इतर अनेक प्रकारच्या कविता लिहिल्या असल्या तरी प्रेमाचे कोमल क्षण निसर्गाच्या त्याहून कोमल प्रतीकातून शब्दांकित करणाऱ्या त्यांच्या इवलाल्या भावकविताच मला अधिक आवडल्या. कारण सुंदर भावनांना सारखं जपायचं आणि त्यासाठी सुंदर शब्द सतत शोधीत रहायचं हे जगाच्या दृष्टीनं व्यर्थ खटाटोपाचं काम फक्त कवीच अत्यंत निरपेक्षपणे करू शकतो. का ? कशासाठी ? हे प्रश्नच व्यर्थ आहेत. सौंदर्याचं स्वप्न आधी पडतं आणि मग सौंदर्य निर्माण होतं. निसर्ग सुंदर असला तरी त्यातली दिव्यता फक्त दिव्यतेचं स्वप्न पहाणारे कविमनच शोधू शकतं— शब्दातून प्रगट करू शकतं. त्या दिव्यतेला साक्षात अनुभूतीचं रूप देऊ शकतं. म्हणून ही कविता वाचणाऱ्याला स्वतःच्या दिव्य पातळीवर क्षणार्धात नेऊ शकते. ती कितीका लहान असेना. अशा काही लहान, सुकुमार पण दिव्य क्षणांच्या दिव्य कविता शरदिनी महाडेश्वर लिहू शकल्या आहेत आणि पुढे लिहू शकतीलही. त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद.

शिरीष पै

**आभार :**

* सौ. शिरीष पै
* कविवर्य नारायण सुर्वे
* प्रकाशक वामनराव भट
* मुरलीधर सावंत

## एक

अवघ्या जमिनीवर मऊ कोवळे आच्छादन
थेंब थेंब चमकणारे दवाचे त्यावर
इथूनच; इथूनच करायचा म्हटला प्रवास तर
पावलांना कुरवाळणारी
ही गवताची पातीं
संख्येनें मोजता येणार नाहींत
इतकी अगणित·······अनंत अथांग
तुझी आठवण ! !

## दोन

हो सुंदर उमललेली सकाळ
वर मोकळे आभाळ
अविरत पावसाळ्याच्या कितीक दिवसांच्या
दुराव्या नंतरचा
उन्हाचा सुवर्ण–सोहळा
निसटून पळू पाहणारे, साक्षात्काराचे हे दिव्य क्षण
असेच नाहीत का पकडून ठेवता
येणार ?

## तीन

उमललेल्या फुलांना
कसलाच गंध नसावा
स्वतःच्या व्यक्तित्वा पलिकडचा
अशा धुंद बेहोष रंगांचा
कशाला कशाला अट्टाहास ?

## चार

वादळी वाऱ्यांत
हिंदकळून जाणाऱ्या झाडाखाली
नकोच ते उभं राहणं ... ... ...
आधारासाठीं

## पाच

हा दिवस उजाडलाच नसता तर
ह्या अशा अनाम वेदनांचा ताण
सोसणं तरी चुकलं असतं !
पूर्वीचीच मी
पूर्वीचंच सारं सारं कांहीं
भरती ओसरल्यावर
पूर्वीचाच किनाराहि
पूर्वीपेक्षा वेगळा

## आठ

आभाळाची गूढ भाषा,
क्षितिजापर्यंत भिडलेल्या अस्पष्ट धूसर डोंगररेषा
अस्वस्थ करून सोडणारे
सर्वदूर पसरलेले हिरवे विचित्र आभास
ठायी ठायी प्रतीक्षा करणारे उंच ताड,
ग्रिलमध्यें कैद करू पाहाताहेत
हे गवंड्यांचे हात
की अनारकलीला भिंतीत चिणणारे
बादशहाच्या हुकमाचे बंदे ताबेदार !

## नऊ

उन्हाशी झुंजतांना
लाल वेदना सोसते आहे
फांदी फांदी पान पान
मराठमोळे हे इमान
जखम सोसतांना एक तान
हा पांगारा
की ढाल तुटल्यावरहि लढणारा
धीरोदात्त तानाजी !

## दहा

बदल बदल आता बदल

आभाळाची अनावर ओढ

चांदण्या वेचीत हिंडणे सोड

मोकळी हवा मोकळा वारा

प्यायचा कैफ सोडायलाच हवा

या झिंगलेल्या माडांची मस्ती

घ्यायची नसते मनावर कधी

लक्ष शब्द ओठावर रे

आनंदाचे बाग बहरले

अनावर लाट

जिरवून टाक

नको जिद्द नको इमान

पुस्तकांपाठी कासावीस प्राण

गजऱ्याचा गंध दरवळतोय हवेंत

विसर विसर सगळे बेत

तान्ह्या बाळाच्या आईचे पाय

वेळेवर घराकडे वळायला हवेत

## अकरा

पसरल्या आहेत धुक्याच्या लाटा
        क्षितिजरेखेवर अस्ताव्यस्तपणे
अलिकडेच ही मळ्यांतून गेलेली
        लाल नागमोडी वाट
दुतर्फा गच्चगार हिरवे गवत
        निस्तब्ध उभे आहेत
थेंबानीं डवरलेले वृक्ष
        न थांबणारी पावसाची रिपरिप
आणि हा कुंद गारठा
        अखंडितपणे करीत प्रतीक्षा
येणाऱ्या निकटतेची

## बारा

विशाल पसरलेल्या आभाळाखाली
ही दूरवर उभी असलेली झाडे
कांही एकटी·······एकेकटी
कांहीं घोळक्या घोळक्यांनी मुकी
या हिरव्या नेपथ्याला
पांखरांची किलबिल नको······
तू दूरवरून येतांना
मी बेसावध असायला नको
विशाल पसरलेल्या आभाळाखाली
मीहि एक मुके झाड व्हावे
निस्तब्ध.

## तेरा

कलंडलेल्या असतात दिशा
विझू पाहात असते मी स्वतःच
वादळलेल्या आवर्तात.

आपोआप निर्माण झालेले पाश निस्तरण्यापायी
जीवच झालेला असतो नकोसा.

कोणाचीहि सहानुभूती पोहोचायला नको स्वतःपर्यंत
अशा एका अभेद्य तटांत
स्वतःला कोंडून घेणेहि जमलेले नसते

अशा वेळी दुरून
देत असतो इशारा
समर्थ किनारा.

## चौदा

विजन धरतीवर
केवळ तू........मी
आपल्या दोघांपाशीं
देवघेवीला
फक्त
निःशब्द
निराकार
निष्कारण
हुरहूरच
दाट भरून आलेल्या
आभाळा सारखी.

## पंधरा

कशाला हा ध्यास
फार पलिकडे पसरलेल्या
दूरवरच्या धुक्याचा ?
कदाचित् असेलहि
हा सगळाच
फसवा आभास

## सोळा

आकाशभरांतहि
हे माड बिलगलेले
देताहेत सोबत एकमेकांना
ऊनपावसांत
वाऱ्यावादळांत

## सतरा

आकर्षक मुखपृष्ठाच्या
आखीव रेखीव बांध्याच्या
झुळझुळीत तलम पोताच्या
पुस्तकांच्या जगांत
प्रवेशतांना होतो
दिक्कालातीत प्रवासाचा मोह
बदलत्या वेळेचेहि
भान हरपवणारा !
पुस्तकांच्या जगांत
रात्रीचा व्हावा दिवस
दिवसाचीहि सुंदर सकाळ
वर मोकळे आभाळ
ग्रंथालयाची व्हावी बोट
बोटीला नको किनारा
कधी मधी यावा फक्त
चहाचा कप सामोरा

## अठरा

पान पान गळून पडल्यावर
लाल लाल फुलला अंगार
याच्या फांद्या फांद्यावर
हा पळसबहार
हे नित्य दृश्य
नित्य सत्य
तुझ्या निकटतेची पाने गळून पडतात,
संपतात सहवासाचे दिवस
दूर होतो आपण
दुरावतो एकमेकांना
मी निष्पर्ण असते, निष्पाप असते
धुंद असते तुझी आठवण
उन्मादक असतात स्मृतीचे गंध
माझ्या शब्दाच्या आरशा आरशावर
फेकलेस कवडसे
दूर राहूनच

## एकोणीस

तेव्हापासून आसू असे वहात आहेत
तेंव्हापासून डोळे माझे नहात आहेत
तेव्हापासून ओठ असे मुके झाले
तेव्हापासून केस असे रुखे झाले
तेव्हापासून काजळ असे फिक्कटले
तेव्हापासून मीच अशी विस्कटले
त्याच्या आधी सगळे कसे नीट होतें
आहे त्याहून कितीतरी मी धीट होते
आला क्षण सुखामध्यें भिजवीत होते
वावरतांना हंसण्याचे संगीत होते
सावरतांना मला कधीच पडले नव्हते
तुझ्यावाचून माझे कांहीं अडले नव्हते
बेफिकिरींत मी तर पुरती बुडले होतें
पण आता सगळेच कसे अर्धेच उरते
कविता माझी तुझ्या मागून वणवण फिरते

## वीस

माझ्या घराच्या पडदाशील खिडक्यासुद्धा
कधी कधी लाज बाजूला सारतात
अन् मग इतका वेळ पायरीशी रेंगाळणारं ऊन
लगबगीनं आंत येतं
तशा उन्हासारखाच
तू जर येणार असशील
तर मी सुद्धा
संकोचाच्या पाकळ्या बाजूला सारून
तुझ्या स्वागताला सामोरी येईन

## एकवीस

वळणावरून वळतांना
त्या ओळखीच्या झाडाची
वाऱ्यावरची हलती पानं
पाहूनहि न पाहिल्यासारखंच केलं
म्हटलं जाऊ दे
तर भलीथोरली रिकामी लॉरी
माझ्यापुढून धावतच गेली
पाठीवरली अक्षरं नाचवीत
“ फिर मिलेंगे ”

## बावीस

क्षण सुवर्णकांचा
त्याचा वर्ख पानोपानी
लिफाफ्याला मिटतांना
ओला केला मी ओठांनीं

लिफाफ्याच्या पोटामध्यें
एक फाया अत्तराचा
पत्र टाकतांना झाला
जीव भित्र्या पांखराचा

## तेवीस

हवे तेव्हां नाही येत
निळे आभाळ भरून
हवे तेव्हा दुरावते
सोनसळी उष्ण ऊन
नको तेव्हा घामेजते
भाळ वेडचा आभाळाचे
नको तेव्हा लागे मागे
खुळे ऊन दुपारचे
खुळे ऊन दुपारचे
पाठ पुरती पुरवी
त्याला चुकवाया बघे
माझी पळती सावली
सावलीला पळतांना
भुई झाली थोडी थोडी
थोडचा थोडचा भुईसाठीं
पायपीट ही चालली

## चोवीस

तिळा तिळाने
उजळून आले
हळदीवाचून
पिवळी झाले
आणिक माझ्या
काये वरले
तीळहि हंसले
का हंसले ते
मला न कळले
अजाणता अन्
हलव्यामधल्या
तिळापरी मी
रोमांचांनी नटले
आता तरी रे
मुक्या मनाचा
उघड तिळा
अन् त्यात आसरा
दे मजला

## पंचवीस

हातमिळवणी
करू नकोस
बोल गुळवणी
घोळू नकोस
मला बघून
वळू नकोस
दीठ भेट
जुळवू नकोस
पुन्हा अशी
खुळवू नकोस

## सत्वीस

हा जून बहरणारा
लाजून दूर सरणारा
गंधवती धरतीचे धुंद निश्वास
नव्या कोऱ्या पुस्तकांच्या पानांचा सुवास
नव्या नव्या खरेदीचा नव्या वर्षाच्या अभ्यासाचा
कशाकशाच्या मनोरथांचा
बघता बघता संपणारा
तरीहि दरवर्षी नवा नवासा
हवा हवासा वाटणारा हा जून
एक जादूगार
सबंध वर्षाच्या महिन्यांचे दिवसांचे थवे
यक्ष नगरीत उधळून देणारा अक्षय
माझ्या रक्तातल्या एका विद्यार्थिनीचे
कोड पुरविणारा हा जून
कधी संपूच नये
परीक्षेची हुरहूर कधी संपूच नये

## सत्तावीस

घमघमली मोगरी
हंसे रान पानोपानी
उरी दडला सौरभ
उधळते वेडयावाणी
उधाणल्या सुगंधाला
कोणी घेईना लुटून
कोणी येईना रसिक
दूर परदेशाहून
हूडद्वाड वाऱ्याचीहि
रान चाहूल टिपते
आपल्याच सांवलीला
आपणच निरखते
कळीपाकळी सुकली
तापतापल्या उन्हाने
कुणी तरी पाही सारे
दूर साळसूदपणे

## अठ्ठावीस

अवचित द्यावा
निरोप धाडून
वाऱ्यावरती
वाऱ्यावरती
स्वार होऊनी
तोहि उतावीळ
ट्रिंग ट्रिंग त्याची
टिपून घेती
हळव्या भिंती
धीर न त्याला
भारी घाई
मी यावे तर
ट्रिंग ट्रिंग त्याची
वाढत जाई !
लबाड भिंती
चोरुन टिपती
थेंब थेंब ते
मधाळ हितगुज
अन् ओठांच्या
उंबरठ्यावर
आशंकेने
अडखळणारे
सावरते मी
सावरते मी
शब्द लाजरे

## एकोणतीस

डोळ्यांनी बोलले
        डोळ्यांशी
बेभान डोळ्यांची भाषा
        डोळ्यांना समजणारी
स्वतःजवळचे
        सर्व शब्द
हरवल्या नंतरची........

## तीस

अशा पावसांत
बकुळ फुलांचा
ओळखीचा वास
दरवळे........

अशा पावसांत
माती लाल लाल
बघता बघता
विरघळे.......

लाल तिचा लोट
वहात वहात
कुठेतरी दूर
दूर पळे

हुरहुरे मन
अशा पावसांत

# एकतीस

हे आकाश धीट माड दाटीवाटीने
आता उभे आहेत साळसूदपणे
जेव्हां फार मोठे वादळ होईल
या किनाऱ्यापासून आपण दूर असू
अधून मधून तळपणाऱ्या विजेशिवाय
इथे कोणीहि नसेल
तेव्हा यांना खरा कैफ चढेल
यांच्या दंगामस्तीला
येईल ऊत अतोनात

## बत्तीस

धरती आकाश मिळतात तिथे
फिक्कट गुलाबी प्रकाशांत
उजळणारी डोंगरकडा
भुरभुरणारा वारा
        उग्र गवतगंधाची सोबत
        मातीवर उमटलेले
        टायरचे ठसे
बरंच काही बोलून जातात
निस्तब्ध उपस्थिती विषयी !

## तेहेतीस

त्या फुलाचं नश्वर शरीर
असेल असेल !
त्याचं उमलणं
त्याचा गंध
त्याचे काटे
त्याची पाने
त्याचा रंग
त्याचं ताजेपण
हे सगळं खरं खरं
अगदी कविते शप्पथ

## चौतीस

मी कविता लिहिणे बंद केले आहे
सगळे आवेग जिरवले आहेत
स्वतःच स्वतःची समजूत घालण्याची
एक अवघड कामगिरी बजावताना
कशाला हवे आहेत शब्दांचे विभ्रम ?
मनातले मनातच उमटून विरायला ?

## पस्तीस

खूप दिवसानी भेटावा
दुरावलेला मनस्वी आनंद
तसे हे शरीर भर उन्हात उभे डोंगर।
खूप दिवसानी
गवसलेला सूर
खूप दिवसानी पुन्हा
उत्कट अधीर
खूप दिवसानी पुन्हा
उत्कट अधीर
खूप दिवसानी
व्यक्त न करता येण्या जोगे क्षण
खूप दिवसानी
रोमा रोमात आठवण
खूप दिवसानी
तू मी उन्मुक्त, उन्मुक्त।
खूप दिवसानी ॥

## छत्तीस

जिप्सी कलंदर
जिप्सी बिलंदर
जिप्सी फकीर
जिप्सी बेफिकीर
जिप्सी प्राणात
जिप्सी मनात
जिप्सी शरीरभर रक्तात
प्रत्येक उंच उचंबळणाच्या लाटेत
जिप्सी अनंत
जिप्सी अथांग

## सदतीस

बांधले गेले स्वतःला नकळत
अगदी सहज सहज
        मला तुझ्यासकट
हे सगळं जाणवत राहातं
विस्तीर्ण दुरावा
पसरतो तुझ्यामाझ्यात
त्या क्षणांत

## अडतीस

कविता पाहून होत नसते
ती साक्षात् जन्मत असते
जगत असतांना
संगीन रोखली असतांहि
प्रत्युत्तर करणाऱ्या ज्वलंत उद्रेकासारखी
ती स्फुरत असते
लाटांच्या गर्जनेसारखी
ती अविरत असते
मुक्त होण्यासाठीं
हिच्या पंखांची फड्फड्
माणसाच्या चेहऱ्यापलिकडची विद्रूपता
तिला दिसत असते.
पावसाच्या थेंबांत निथळणाऱ्या
निष्पाप गवतासारखी
ती प्रफुल्लित असते.
तरीहि निसर्गाच्या प्रकोपापासून
गुरावासरांच्या आक्रोशापासून
ती स्वतःला दूर ठेऊ शकत नाही.
उपाशी तापाशी लेकराबाळांच्या टाहोपासून
ती अंतर राखू शकत नाही.
श्रमणाऱ्यांच्या घामाच्या थेंबांनीं

ती पवित्र होत असते.
अनेक वादळी आवर्तात
ती फोफावत असते.
झुंजत असते प्रतिकाराशी
झेप तिची क्षितिजापल्याड
कविता पाहून होत नसते
ती साक्षात् साकारत असते.

## एकोणचाळीस

हिरवी जरीकांठी साडी
कधीं वाटते ल्यावीशी
दाट हिरव्या चुड्याची
किण किण हातापाशीं !

अबोलीचा ओळसर
वाटे रुळावा केसांशी
आणि घट्ट बिलगावी
काळी पोत गळ्याशी

जोडव्याचें नवेंपण
अडखळावे पायाशी
आणि विसरून जावें
मीच मला तुझ्यापाशीं

# चाळीस

चिमणीच्या डोळ्यांनी टुकूटुकू पहायला शिकलीस
... ... ... कुठे तरी !

साई सारखे मऊ अंग
जीभ इवली लाल चुटुक चुरुचुरु फिरत होती
जिवणीच्या कोपऱ्यांतून हंसत होतीस
माझ्या जीव फुला
जिवाच्या पाकळ्या वरून अलगद घेतलं जवळ तुला !
तेव्हांपासून हंसू रुसू क्षणांत गुंफल्या दिवसांचे
पक्षी उडून दिसेनासे होतात एकामागोमाग
आणि तूंहि फुलूं लागलीस, हंसू बोलूं लागलीस
तुझ्या अस्तित्वांत घरदार पुलकीत झालंय. बेटा—
तुझ्या लीला पाहायला
आईचे डोळे लाभलेत
आणि माझ्या पोरकेपणाचं
सार्थक झालं.

## एक्केचाळीस

ऐन हिरवेपणांत
नित्य नयनांत आंसू
आणि ओठांवर हांसू
नकळत ............
दाट गडदपणात
नाहीं कोठें अनुराग
फक्त विराग विराग
रुसव्यांत .........
मी अबोली ओली ओली
नको मागूं गंध–वास
पुरे माझी वेडी हौस
फुलण्यांत ........

## बेचाळिस

माझ्या स्वप्नांत सदाच असतं
    क्षितिज हरवलेलं उदास आभाळ
मग गुलाबी रंग तिथं असणार कुठून ?
माझ्या स्वप्नांत रात्र असते
चांदण्यांच्या टांचण्यांनी कळवळणारी
माझी पहाटेची झोपमोड तरी मग होणार कुठून ?
    माझ्या स्वप्नांत मी असते
        एक बर्फाची पुतळी
    तुझ्या किरणांत चमकायला उत्सुकलेली
        पण तू तर येतोस
    मलाच वितळवीत !
मग स्वप्नांत तरी
मी तुला भेटणार कुठून ?

## त्रेचाळीस

अंधाराला उजळीत
झाले प्रकाशाची ज्योत
आता नाही लाभायची
कधी छाया आयुष्यात
छाया पडेलच कशी
माझ्या प्रकाशकायेची ?
सारा जन्म जळतच
घाई वाट चालायची
चालायची धांदल ही
केली पाहिजेच आता
नाहीतर विझेन मी
कुणी फुंकर घालता !

## चव्वेचाळीस

झाड वाऱ्यात
झाड तोऱ्यात
तोलीत धारा धारा

झाड एकटेच
ढग तेवढेच
पाऊस दाटलेला

## पंचेचाळीस

फडक्यात थाळी
थाळीत भाकर
हात धुवून घाईघाईने
ड्यूटीवर रुजू होणारे चाकर

गाववाल्यांना दिलासा देणारी
सुंदराबाईची खाणावळ
माया वाळगून उभी आहे
शिमिटाच्या चाळीच्या उराशी

## सेहेचाळीस

या चिंब निथळणाऱ्या पावसाने
झोडपून काढलेली झाडे
गवत झाकून गेले आहे पार
मातीच्या लाल पाण्याने
आकंठ बुडालेली शेते
सरसर वरसणाऱ्या सरी
कुठे तरी अंग निथळीत
चिवचिव करतेय्
चिमणाचिमणीची जोडी
तेवढाच काय तो आवाज
आणि कोसळणाऱ्या पावसाचा

## सत्तेचाळीस

विझून गेलेली उदबत्ती
धूम्रवलयं रेंगाळतायत् नुसती
दूरवर शांत विसावलेली वस्ती
ही रात्र अर्धी उलटून गेलेली

दाटून येताहेत कढ अनावर
लिहिताना थांबलीय् लेखणी

## अठ्ठेचाळीस

धारा आभाळातून
  धारा छपरावरून
    धारा शेतातून
        झाडाझुडुपांतून
धारा दिसताहेत
  उघडचा खिडकीतून
    कुठून कुठून
  धारा डोळचातून
    थांबत नाहीत
      बरसून बरसून

## एकोणपन्नास

### मी अशी

झपाटली जात असतांना
झाडांनो माडांनो
वाऱ्याने हलणाऱ्या पानांनो
उध्वस्त आकाशा
थांब जरा पलिकडे कलणाऱ्या
लालभडक सूर्या
कविता सुचत आहे
भट्टी पेटलेली धूर ओकत आहे
तिच्यांतली प्रत्येक वीट
फुलून उजळली आहे
सूर्य मावळताच
दाटत येणाऱ्या काळोखा
थांब जरासा
कविता सुचत आहे
समोरचे क्षितिज
या काळोखात
डोंगर कडांशीं
निपचित पडून राहील
दूरवरचे माड संथ धुक्यांत
ध्यानस्थ बसतील

काळोखाची दुलई पांघरण्यापूर्वी
हे अवकाशा
तुला एकदा डोळे भरून पाहू दे
कविता सुचत आहे

## पन्नास

आत्ता आत्ता तर या इथेच तुझे धीर गंभीर निश्वास
कुठे विरले ते आत्ताच ऐकलेसे वाटणारे तुझे शब्द तुझे भास ?
नमस्कार करताच प्रतिनमस्कारार्थ तात्काल जुळणारे तुझे हात
आता पुन्हा कधीच का ते जुळणार नाहीत ? शुभ्र वस्त्रात
लपेटलेत आज
गळा तुळशीमाळा लेवून निघाला आहेस का महायात्रेला ?
उरी फुटू पहाणारे हुंदके समर्थ नाहीत का ? तुला अडवायला ?
पितृत्वाच्या खाणाखुणा घराबाहेरहि विखुरलेल्या
तू लावलेल्या झाडाझाडांतून सावल्या हलत राहिलेल्या
तूच ना पेटवली होतीस उदबत्ती देवघरात ?
त्या धूम्रवलयात हातावर ठेवलीस मोगरीची फुले आत्ता इतक्यात
का केलीस अपार माया ? ओसंडून वाहाणारे कौतुक ?
का केलेस मनस्वी अभिनंदन ? गुलाब पाण्याची शिडकावण ?
कशाला तुझ्या अवचित येण्याने केलास उल्हसित इथला आसमंत ?
खुशीत झुलणारे माड सळसळणारे हिरवे गवत शेत
बांधल्या जाणाऱ्या नव्या वास्तूचा खांबन्‌खांब न्याहाळलास
तू मात्र अचानक एखाद्या खांबासारखाच निखळलास
दिवसामागून दिवस उलटतील, ह्या नव्या वास्तूत पुन्हा जल्लोष
उसळेल
पण या शापित वास्तूत तुझी पावले पुन्हा कुठून उमटायला ?

नियतीच बोलली की उमटली तुझ्या मुखातून वाणी,
"मी पुन्हा येणार नाही."
शब्द खरे केलेस ! का असे वैर साधलेस !
भरून आलेले मळभच केवळ साक्ष आहे ह्या व्यथेला
का कोसळत नाहीत धारा ? का येत नाही हलकेपण मनाला ?

## एकावन्न

एक दिवस निव्वळ स्वतःसाठीच स्वतःचा
एक दिवस उन्मुक्त अनावर नशेचा
एक दिवस ध्यानावस्थेकडे झुकलेल्या
राजपुत्र सिद्धार्थासारखा
तर कधी फुलांठायी गोवऱ्या वेचण्याचा
कधी कधी ढगांवरून चालतांना
अलगद चांदण्या खुडण्याचा
सुखाच्या उत्तुंग शिखरावरचा
वाऱ्यावरचा ताऱ्यावरचा
अगदी थेट चंद्रावरचा
एक दिवस विझू विझू पहाणाऱ्या गात्रांनी
आई होऊन पुनर्जन्म जगण्याचा
वेदनेच्या मिठीत सामावून जाण्याचा
हिवाळ्यातील फिकी फिकी पाने होऊन
पायतळी कोसळण्याचा
एक दिवस क्षितिजरेखेवरल्या धुंद रंगात
बेहोषपणे स्वतःला झोकून देण्याचा
एक दिवस कामगारांच्या
रोजीच्या रोटीच्या ज्वलंत सवालाने
बुलंद आवाज उठवण्याचा
विद्रोह करून उसळण्याचा

एक दिवस चालत आलेल्या वाटेवरचे
स्वतःच्याच पावलांचे रक्तबंबाळ ठसे
वळून न्याहाळण्याचा
लांबच लांब रांगेत उभे राहून प्रतीक्षा करीत
मृत्यूच्या कुशीत चिरशांती मागण्याचा
स्वतःच्याच निर्माल्यवत देहावरच्या
जुईपुष्पांच्या बरसातीचा
शहनाईच्या भैरवीचा
एक दिवस

## बावन्न

चिच आवडायला लागल्यापासून दिवसरात्र
सूर्याचे किरण, चंद्राचे तोरण
लाल फुलांच्या पायघडचा वाटेवर
धाडावी बोलावणी भावंडांना, मैत्रिणींना,
कौतुकाच्या कुणाकुणाला.
पोचते करावेत निरोप वायुवेगाने म्हणून
कुणाकुणाचे दूरध्वनी आधीच डायरीत टिपून ठेवलेले.
तूप खानदेशी
काजळासाठी चिंध्या कावळचाच्या अंडचात भिजलेल्या
बाळाला बाधू नये सर्दी म्हणून
गरम कपडचांची जुळवाजुळव
पाळणा हवा रंगीत सुंदर लाकडी नक्षीकामाचा
खादीभांडारातला
पाळणा गावा जीव ओतून शिवाजीचा
खणखणीत स्वरातला.
नाव घ्यायचा आग्रह व्हावा
मैत्रिणींकडून
जपून चाल, जपून वाग शब्द कुणाचेसे राहिलेत आठवून
मर्फीचा बाळ समोरच्या टेबलावर
सतत दिसेल अशा बेताने हसणारा.

बारा जूनला कशा घडत गेल्या घटना
एकामागोमाग एकेक झरझर
समोरच्या क्षितिजरेषेवरून कोसळणारा
पाऊस अव्याहत
तळाच्या मातीत झिरपणारा.
माझा राजू कणाकणाने समोरच्या मातीत मिसळतोय्
मला सांभाळता न आलेला
गात्रागात्रातून फक्त जीवघेण्या वेदनाच उरलेल्या
रडण्याचेही त्राण नाही, मायेचे कोणी जवळ नाही
माझ्या कॉटसमोर फक्त रिकामा पाळणा.

## त्रेपन्न

रंगी बेरंगी दुपट्यानी भरून जावी सगळी दोरी
दिमाखदार पाळण्याने अडवावी घराची गॅलरी।

उटणी, ऊद, धूप, दृष्ट, शेकेचा धूसर निखारा
यांच्या संमिश्र दरवळाने मोहरावा घराचा कोपरान् कोपरा।

हळूहळू दोरीवर दिसू लागावेत रुबाबदार बाबा सूट
याचे बूट, मोजे, दप्तर शोधून देताना उडावी तिरपीट।

खट्याळाच्या हुंदडण्याला पुरू नये मैदान
आईच्या कुशीत मात्र बच्चूचा उतरावा सगळा शीण।

माझ्या रागारागाला ह्याने बुडवावे गालावरल्या खळीत
खूप खूप वाढावा राजू व्हावा आईपेक्षाही उंच दीड वीत !

याची जाड जाड पुस्तके, बॅट, रंगाचे कुंचले
हे सारे न्याहाळताना न कळतच आठवणीचे एक पान उलगडावे।

खूप चपळ लगबग, लगबग, याला ठाऊक नसावा थिसावा
कॉलेजात निघालेला राजू थेट, वडिलांसारखा दिसावा।

रुंद खांदे, कपाळावरची झुलपे, सावरणारे हात
खूप खूप स्वप्ने ह्याच्या भावूक डोळ्यात।

असा तसा कसा अगदी जसा मला हवा
एक राजू माझ्या घरात सोन पावलानी यावा।

एक राजू माझ्या घरच्या
सोन पिंजऱ्यातच रहावा।

## चौपन्न

परळ नायगाव भोईवाडा मैदान, कामगार मैदान
सदान्कदा माईकवरची वर्दळ
सदान्कदा दिवे झगझगीत प्रकाश फेकणारे
चेहऱ्यावरचा रंग पुसल्यानंतरही
ढोलकीच्या ठेक्याबरोबर
उंच उंच गगनाला भिडणारा सूर चढवून
महाराष्ट्रगीत समूहाच्या शब्दाशब्दातून झिरपणारे.

परळ नायगाव भोईवाडा मैदान, कामगार मैदान
या इथेच घडवले जातात
बुभुक्षितांना तासन् तास राबवणाऱ्या सैतानांविरुद्ध
ज्वलंत उद्रेक करून उठणारे नवजवान
कडक पोलीस पहाऱ्याची पर्वा न करता
अंगार फेकणारे मने चेतवणारे शब्द
मुंबापुरीच्या धमन्या मुठीत ठेवणारे
मुंबापुरीच्या धमन्यांना प्रेरणा देणारे
इथे झोपडचा इथे चाळी
इथे इमारती उत्तुंग प्रासादांशेजारी
इथे दैन्य, ओढाताण यातूनही धडपडणारी
सृजनशील मने
एकाच्या दुःखात संकटात

एकाच वेळी सामील होणारे
शताधिक इथे माणुसकीने
याच पथावरून
एकवटलेले आवाज उठवून
विजयाला सामोरी जाणारी जनता
या जनताजनार्दनाचे दर्शन
घडत असते वर्षातल्या तीनशेपासष्ट दिवसातून.
इथे आढळायची नाही,
इथे खपायची नाही,
पोकळ व्याख्यानबाजी.
हात यंत्रावर राबणारे
न्याय मागणारे
वेळ पडल्यास लाठ्या झेलण्यास सज्ज होऊन उठणारे
अश्रुधूर, गोळीबार यांच्याच तालमीत तयार झालेले
अशा अनामिक हुतात्म्यांच्या
रक्ताने लाल झालेली इथली माती
या मैदानासभोवती
झाडे आहेत उभी मुकी
आठवणींना उजाळा देणारी
ओंजळ फुलांची बरसात करणारी
येणाऱ्या जाणाऱ्यांना सावली देणारी
भर पावसात चिंब नाहतांना
श्रवण भक्तीने तन्मय झालेले अनेक जीव
उभे या झाडाखाली !

## पंचावन्न

निव्वळ श्रम
आणि घमेलं सावरणारे हात
हेच तिचं भांडवल
लाल चुटुक साडी
पीळदार स्नायूंना उठाव देणारी
पलिकडे
चुरुचुरु मुठी चोखणारं तिच बाळ

तात्पुरत्या निवाऱ्या समोरही
तिने जोपासल्या केळी
केळीच्या मुळांशी
बाळाच्या आंघोळीसाठी पाथर

पलिकडच्या भव्य वास्तूच्या उभारणीत
तिचा घाम सांडला आहे
हीच एक आठवण
ती इथून निघून गेल्यावरही

थरथरणाऱ्या केळीच्या पानांसारखी
तिच्या निवाऱ्याच्या
रिकाम्या झालेल्या
जागेकडे बघतांना
सतत ........

माझ्या घराच्या उबेत विसावतांना
अनिकेत अशी ती
कुठे असेल ऐन थंडीत
मिळेल का पुरेसा निवारा तिला

भर उन्हाळ्यात
असेल का तिचं घरकूल
एखाद्या सावलीत ?
याच जाणीवेने कधी होत व्याकूळ
भरल्या संसारात
असुखी मी
अतृप्त मी !

## छप्पन्न

दुतर्फा पोलीस लाइनची वस्ती
पोलीस लाइनची राखीव मैदाने
उराशी सांभाळीत चालणारा नायगावचा रस्ता
रात्रंदिवस ललकाऱ्या ऐकणारा
दमदार पावले सातत्याने झेलणारा
एक ऐटबाज वळण घेऊन
ब्रॉडवेशी मिळणारा.
कोपऱ्यावरचा गजरेवाला
न चुकता आग्रह करणारा
कितीही थकवा येऊ देत वाचून
नाक्यावरच्या हॉटेलमधला अदबशीर वेटर
मायाळू आईसारखा
चहा पुढे करणारा
निघतांना न चुकता पानपट्टी देणारा.
या इथे वस्तीवस्तीतून
समतेने वाटप
महागाईचे, गरीबीचे, बेकारीचे, अज्ञानाचे
तरीही उमलत्या मनांचा दरवळ
दरेक सणासमारंभातून उत्सवातून
जिंकण्याच्या जिद्दीने.
राजकीय मतामतांच्या गलबल्यातूनही

एकत्र येणारी समुद्रासारखी श्रमिक माणसे
अविरत लोंढा गर्दीचा
न हटणाऱ्या लाटेसारखा
या नायगावच्या रस्त्यावरून.
आघाडीवर लढणारा
प्रत्येक आंदोलनात
नायगावचा माणूस !
निधडचा छातीचा
वर्तमानाचा
चिरस्मारक
चिरस्मरणीय.

सत्तावन्न

कोहिनूर मिलच्या दाराशी
कोहिनूर मिलच्याच काय पण इथे जवळजवळ
प्रत्येक मिलच्या दाराशी
नेहमीच ऐकतात
कामगार नेत्यांच्या गर्जना
जवळपास वावरणारी कामगारांची मुलें
रस्त्यारस्त्यावरून, चौकातून, मैदानातून
आणि त्याचेच पडसाद उमटतात
त्यांच्या चालण्याबोलण्यातून
इथे निष्क्रियता आढळायची नाही
तीन पाळ्या सदैव चालणाऱ्या या शहराच्या
स्पंदनास्पंदनातून जिवंततेचे अंकन

कोहिनूर मिलच्या दाराशी
केळीवाले, काकडीवाले,
उकडलेल्या शेंगा विकणारे,
भाजलेली मक्याची कणसे विकणारे
त्यांच्या आरोळ्यांनी दुमदुमून जाते
रात्रपाळीच्या कामगारांची मधली सुट्टी
दहा तारखेच्या दिवशींची वर्दळ
नजिकच्या पालातल्या कोंगाटयांचे

सामुदायिक भांडण दोन टोळ्यांमधले
नळावरची पाण्यासाठी चाललेली भांडणे
पिठाच्या चक्कीवरची लांबच लांब रांग
रस्त्यावरून दिसणारी.
भोंगे धूर ओकणारे
तशीच या रस्त्यावरून दिसते आहे
चार खोपट्यांच्या आसऱ्याला
चार बांबूना फडका बांधून केलेल्या आडोशात
नवजात बाळाला जवळ घेऊन
गोंजरणारी आई
मणीपोत विकणाऱ्यांचा तर
सरळ सरळ उघड्या फूटपाथवरचा संसार
बाजूला चांभाराची सामानासकट पथारी
हॉटेलच्या आधाराने चालणारे पानपट्टीचे दुकान
दुकान कसले, एका स्टँडवरचे
गल्ल्यासकट, जाड धुडाच्या मालकासकट !
लेजीम ढोलकीच्या मिरवणुकीत
इंदिराजी, यशवंतरावांचा जयजयकार करीत
गुलाल उधळीत
डफावर थाप देणारे
ऐटदार पटके बांधलेले
बेहोष होऊन मिरवणुकीत नाचणारे

घामानें न्हाऊन निघालेले
सातारा सांगलीकडचे
उफाडयाचे घाटी गडी
अशीहि घडीघडीच्या जीवनकलहावर
मात करणारी रांगडी जीवननिष्ठा !

## अठ्ठावन्न

एकच ध्यास उराशी जपून
ओढीने पावले टाकणारे किशोर
किशोरवयात परिस्थितीने कामगार बनलेले
एक हात लंच बॉक्सवर, पुस्तकांवर
एका हाताने ट्रेनला लोंबकळत
जीवन मरणाच्या सीमेवरून
शिकस्तीच्या प्रयत्नाने वेळ गाठणारे
परस्पर नोकरीवरून शाळा गाठणारे
शिस्त पाळण्यासाठी तहान आवरून वर्गात शिरणारे
काही तरी नवे ऐकले की विस्मयचकित होणारे
आठवतात किती किती अनामिक चेहरे
बाईंवरती खूप खूप माया करणारे
बाईंच्या एका शब्दासाठी
कठोर निग्रह पाळणारे
अश्रुधूर गोळीबार यांची फैर झाडल्यानंतर
मध्येच शाळा सुटल्यानंतर
वर्गातल्या तरुण मुलींना नेकीने घरी पोहचवणारे
यांच्या नसानसातून खेळते आहे
शिवाजीचे रक्त अविरतपणे
कितीहि बेशिस्त दंगल होऊ दे मुंबापुरी शहरात
दहादहा दिवस उठू देत राजकीय वादळे

आपली मते बाजूला सारून
शाळेच्या एकाहि काचेला
तडासुद्धा न जाऊ देण्याचा
निश्चय पाळणारे हे बलशाली युवक
कोयनेच्या भूकंपात मध्येच वीज गेल्यावरहि
मेणबत्तीच्या उजेडात जपून वावरणारे
पेट्रोमॅक्सच्या बत्तीच्या प्रकाशात
शांतपणे पेपर सोडवणारे
वर्गावर्गातून स्वच्छता पाळणारे
वर्ग सजवणारे
शर्यती जिंकणारे
मैदानात कुस्ती जिंकणारे बहाद्दर
सहलीत उन्मुक्ततेचा आनंद निर्मिणारे
दया येऊन कोणी देऊ केलेली
फुकटची मदत नाकारणारे
यांच्याच मनात इतरांसाठी
दया दुथडी भरून वाहाते आहे
यांचे हात सरसावताहेत दुसऱ्यांना मदत करायला
यांची मस्तके होतात अवनत आपोआप
शाहीर अमरशेखना श्रद्धांजलि वाहतांना
सद्गदित होताहेत हे
पहाडी आवाज उठवणाऱ्या शिलेदाराच्या निर्वाणाने

यांचा आहे पुरेपूर विश्वास
स्वतःच्या बाहुबळावर
खरं तर यांच्यापासून शिकावं आम्ही
कसे करावेत सण साजरे
अडचणींचा डोंगर समोर असतानाहि !
कसे हसतमुखाने जावे
संकटाना सामोरे
गुप्तपणे होणारे वार
कसे उलटून लावावेत चलाखीने
कसे करावेत दोन हात
कसे समोरच्या शत्रूचें बळ अजमावावे
कसे नाकारावेत मानभावी मुजरे
पोषाखी दुनियेतल्या शहाजोगांचे !

तर अशी ही कथा आहे …………
अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करणाऱ्या
भर कामगार वस्तीतल्या
रात्रशाळेची.

## एकोणसाठ

हा आंबा करतो आहे कानगोष्टी
पलिकडच्या शेवरीवरच्या
लालजर्द झुपकेदार फुलांशी
बहरलेल्या प्रत्येक पाकळीशी !
आणि माझ्या मनात साकारत असते त्याचवेळी
दलालांच्या चित्रातली नायिका.

तशी तर ही शेवरी नवीनच आहे मला
तरीही इथे आल्यापासून दररोज
पाण्याच्या वाटेवर,
डोळ्यांनी टिपून घेतच असते मी हिला मनसोक्त.
सहज चाळा म्हणून जाता येता.

कॅम्पफायरच्या वेळी
कडाडून घेतलेल्या टाळ्या
आणतात वेगळीच बेहोशी
मात्र सकाळ उजाडताच चुलीतली लाकडे फुंकताना,
धूर डोळ्यांना पाणी आणणारा
खूप भूक लागल्यावर
तयार होणारा स्वयंपाक
पंचपक्वानांना मागे सारणारा.

निवांत दुपारी भरल्यापोटी
समोरच्या आंब्याच्या डेरेदार फांद्यांवर
वाटतो हिंदोळा झुलवावासा

असा हा स्वप्नांचा सौदागर,
तंबू अकरा नंबर
जाळीदार चार खिडक्यांचा,
झुलत्या मनोऱ्यांचा,
फिक्कट फिक्कट पिवळा उशीरा जन्मलेला
मीच केले त्याचे नामकरण
चंद्रमुखी !
या लहानशा घरात एका छत्राखाली
आमची चिमुकली सुखदुःखे सामावलेली,

मावशी सारख्या प्रेमळ
फेणाणीबाई, कंसाराब्बेन, शर्माबेन.
चंद्रमुखी सुलक्षणी
सापाला कधीही आत न शिरू देणारा,
चंद्रमुखी !

इथूनच इथूनच निघते आमची मुक्त सहल
वनावनात शिरायला,
वेलीवेलीशी मैत्री जुळवायला
समोरचा भारत स्काऊट गाईडचा निळा ध्वज
डौलाने फडकत,

विश्वबंधुत्वाचे नाते सांगणारा
हा ध्वज उंचावून
चालणार आहोत आपण सर्व,
एका नव्या वाटेवरून
सूर सूर
जंगल व्यापणारा.

## साठ

कोणाच्याहि घरात असू दे बारसं
उत्साहाने पुढे होऊन
खणखणीत स्वरातला
शिवाजीचा पाळणा
गावा तर सासूबाईंनीच

सराईत हातांनी
केलेले रुचकर पदार्थ
आग्रह करकरून
मायेने पानात वाढावेत
तर सासूबाईंनीच

नातवंडांच्या दुखण्याबाण्यात
रात्रंदिवस कष्टावे
तेहि त्यांनीच

शेजारच्या आयाबायांना
मदतीचा हात पुढे करून
चार धीराच्या गोष्टी
सांगाव्यात त्यांनी

आल्यागेल्याला आसरा
घराला घरपण
त्यांच्या अस्तित्वामुळे

अडल्यानडल्याच्या लग्नात
स्वैपाकापासून पंक्तीतल्या वाढपापासून
प्रत्येक कामात पुढे होऊन
पदरमोड करून
शेवटपर्यंत निभावून न्यावे त्यांनी

हळदीपासून प्रत्येक प्रसंगाला
समयोचित ओव्यांचा
कितीतरी साठा त्यांच्याजवळ
खणखणीत आवाज
गात असलेल्या दहाजणीत
ओळखू येणारा
त्यांचाच !
खूप स्थित्यंतरे, संकटे
मुंबई शहरावरची
महायुद्धातल्या गोष्टी
मशीनगन्सचा मारा
सोजिरांची एकच लाट
सर्वत्र पसरलेली
हे सगळे सांगितले त्यांनी

प्रकाशबंदीच्या काळात
भाकऱ्या थापता थापता
काकणांच्या किणकिण आवाजात
मेणबत्तीच्या उजेडात
त्यांच्यापाशी आहे आठवण

प्रदीर्घ संपाच्या काळातली
संप नेत्यांची सक्रीय मदत
गोणी गोणी भरून
सहा सहा महिने
धान्य पुरविणारी
फसलेल्या कटांची
संप नेत्यावरच्या मारेकऱ्यांची

या घराचा उंबरठा ओलांडून
येणाऱ्या सुनेला
पूर्वीचे संस्कार पुसून टाकून
नव्याने घडवले त्यांनी
तिचे पोरकेपण
तिला विसरायला
लावले त्यांनी

संमर्दातला संतोष
भरल्या गोकुळातला
निर्मावा त्यांनी !

## एकसष्ठ

शेख मुजिबूर रह्‌मान झिंदाबाद
हा तुझ्याच विजय घोषणांचा नाद
पोचत असेल का तुझ्यापर्यंत ?
जरी असेल कोंडलेले तुझे शरीर
सैतानांनी बराकीत .... .... ....
बेडचा झेलणाऱ्या मनगटांना, बाहूंना
चढत असेल स्फुरण .... .... ....
पोचत असेल का उजेड तुझ्यापर्यंत
उजाडलेल्या स्वातंत्र्य सूर्याचा ?
ज्याला लक्ष लक्ष ओंजळींचे रक्त अर्घ्य मिळाले आहे.
उजाडण्यापूर्वीच !
तुझ्या श्वासा श्वासा गणिक
अस्वस्थ आम्ही तुझे इथले स्वकीय.
सैतानी, क्रूर पशूंनी घेतला असेल का इथं तर तुझाही बळी ?
जनतेच्या अंतःकरणातले तुझे स्थान
नाही हिरावून घेऊ शकणार कुणीही !
मार्च १९७१ मधले
कोणतेही वृत्तपत्र हातात धरवत नव्हते
पानां पानांवरले रक्तलांच्छीत क्रूर अत्याचार
अजिबात वाचवत नव्हते.
पोचत होते निरपराध जनतेचे आवाज
आमच्या कानापर्यंत
भिडत होत्या किंचाळच्या रणगाडचाखाली चेंगरणाऱ्यांच्या
आमच्या हृदयापर्यंत
कसे मिटावे डोळे ?

विसरू शकत नव्हतो आम्ही कल्पनातीत मानवी हत्याकांड !
केवळ दगडमातीचाच नव्हे
हा देश आहे मनस्वी अंतःकरणमय माणसांचाही
ज्यांचे पक्षभेद आहेत मिटलेले ···· ··· ····
संघर्षाच्या क्षणी आहेत सारे पेटलेले
का मिळू नये इंदिराजींना
परदेशाच्या पार्लमेंटमध्ये
उघड बोलण्याची संधी ?
का यावी अकारण रक्त सांडणाऱ्यांच्या मदतीसाठी
हत्यारांनी भरलेली युद्धनौका ?
या प्रश्नांची उत्तरे जेव्हा आम्हाला सापडतात
तेव्हा आम्हीही होतो साम्राज्यशाहीच्या विरुद्ध लढणारे सैनिक,
नुकताच नुकताच होत असलेला आमचा उत्कर्ष
पाहवला नसेल प्रगत राष्ट्रांना
आम्हाला जमीनदोस्त करण्यासाठीच
महायुद्धास्तव निवडले कुरुक्षेत्र त्यांनी
या सैतानी शक्तीविरुद्ध लढताना
या देशाची जनता
निर्वासितांच्या बोज्यांनी अवस्थ झाली तरी
नाही बाळगणार तमा त्याची
कारण आमच्या हृदयापासूनच्या
शुभेच्छा, सदिच्छा, सक्रीय मदत
स्वाधीन बांगलाच्या पुनर्वसनासाठी !
एका नव्या उमलणाऱ्या
लोकशाहीच्या स्वप्नासाठी !

## बासष्ठ

क्रौंच पक्षाच्या मादीचा विव्हल स्वर
वाल्मीकीच्या कवितेला कारण होतो
दुष्यन्ताकडून मृगाक्षीची मृगया होते
असाही एक क्षण येतो.
ही मृगया
केली जात असते
निव्वळ सुंदर घनदाट अरण्यातच का ?
की फिल्मी पडद्यावरती ?
ही मृगया केली जात आहे
भर हाटात, भर गर्दीत, भर दिवसां अन् दर क्षणीं !
माणसाकडून माणसाची, माणसातल्या माणुसकीची
साठेबाजांच्या उत्तुंग कोठारांच्या पार्श्वभूमीवर
भूकबळींची वाढत जाणारी संख्या
झोपडी झोपडीतून पेटणारा जाळ
आलेमेनच्या कळकट्ट पातेल्यातून
काही बाही शिजत असल्याचा वास
त्याकडे नजर लावून बसलेली
हातापायांच्या काड्या झालेली भुकेली पोरे
रस्त्याच्या कडेला.
यांना का असू नयेत स्वच्छ कपडे, स्वच्छ घरे ?
यांना का मिळू नये निगेचं जेवण
यांना का लाभू नये साधंसुधं समाधानी आयुष्य ?
का ?
काळाच्या पाटीवर गिरविल्या जात असलेल्या
" २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन " या अक्षरांना
लाभू देत काहीतरी अर्थ
जो या घटनेच्या शिल्पकाराने कोरला आहे शब्दातीत !

" नष्ट झाल्या पाहिजेत सर्व झोपडचा " हे नेहरुंचे उद्‌गार
आजही घुमत आहेत का आसमंतात ?
दररोजच्या कठीण होत जाणाऱ्या आयुष्यातून
आजचा दिवस जल्लोषात साजरा करणाऱ्या
या देशावर उत्कट प्रेम करणाऱ्या
असंख्य दरिद्री प्रजाजनांना पाहतांना
त्यांचे शोषण करून मिरवतांना
कोणालाच कशी वाटत नाही लाज !
आज डोळस होऊन कृती करण्याचा क्षण
जवळ येऊन ठेपला आहे.
का ऐकायची आमच्या कानांनी
नुसतीच समाजवादी देशातली समृद्धी !
उराशी बाळगलेली मनस्वी स्वप्नें
होऊ देत साकार आमच्या नजरेसमोरच
चिखलात झडीत आडोसा करून राहिलेल्या
अर्धनग्न, अनिकेत, अन्नान्न दशेतल्या अथांग श्रमणाऱ्या
प्रेमाची ऊब न लाभलेल्या उमलत्या जिवांना
वर उचलणाऱ्या कैक जणांची
आज नितान्त गरज आहे
नव्या पिढीला घडवतांना
अंधार उजळत आभाळभर पसरत जाणारे
असंख्य प्रकाशलोलकांचे आतष झुंबर
फुलवू देत आम्हाला या आमच्या हातांनी
दीर्घ दीर्घ रात्र संपून
नवी पहाट उजाडे पर्यंत !

## त्रेसष्ठ

कधी ? कुठे ? कुणावर ?
उगाचच ? की सकारण ?
या प्रश्नांच्या तीक्ष्ण भाल्यांनी
करू नकोस ना मृगया अशी
अधीर, हळव्या, उत्कट होऊन
तुला भेटायला सामोऱ्या आलेल्या
माझ्या मनस्वी कवितेची !

बघ भेटता आलं जाऊन तिच्या अतिगूढ पातळीवर
दवभरल्या पाकळीची
घेऊन किंचित् थरथर
तिला भेटायला जाता आलं तर
तिला भेटतांना
दे सगळ्या शंका निःशंकपणे वाऱ्यावर सोडून
किनाऱ्यावरच्या खडकांवर आदळणाऱ्या लाटेसारखा बेछूट होऊन

तिला भेटायला जातांना
विचार हवं तर स्वतःला विसरून वहात चाललेल्या
खळखळणाऱ्या धुंद निर्झराला
विचार बेभानपणे शीतल चांदणं बरसणाऱ्या चंद्राला
हवं तर निःशब्दपणे गंध उधळणाऱ्या फुलाला विचार
नाहीतर वादळमिठीत भिरभिर गिरक्या घेणाऱ्या
उन्मळलेल्या वेलीला विचार

तिच्या आभाळवेड्या अनामिक वेदनांचा ठावठिकाणा
सांगू नकोस पण अगदी कवितेशप्पथ
तुझ्या सावध प्रश्नाचं तिच्याकडून मिळालेलं बेसावध उत्तर
तुझ्या स्पष्ट निर्णायक शब्दातून
धूसरता दूर सारून, अबोध हुरहूर वजा करून
नको ना !
निसटून पळू पाहाणारे साक्षात्काराचे दिव्यक्षण
पकडून ठेव पळताना मिठीतून !

REFBK-0020828
REFBK-0020828

**शरदिनी महाडेश्वर** ह्यांच्या तरल भावकविता वाचताना माझ्या मनात आले की जगाच्या दृष्टीनं ज्याला काहीच महत्व नाही अशा एका एका हलुवार क्षणांचा पाठलाग ही कवयित्री सारखा करते आहे. ते क्षण जरा हाती लागताच भावोत्कटतेचे दिव्य सौंदर्य अनुभवते आहे. आणि मग त्या हलुवार क्षणांना तितक्याच हलुवार शब्दांत उतरवण्यासाठी तळमळते आहे. निसर्गाच्या सान्निध्यात तिला त्या हलुवारतेचा, दिव्य कोमलतेचा साक्षात्कार होतो. निसर्गापाशी कधी ती एकाकी भावनांचे उद्रेक अनुभवते तर कधी कधी मनाची गूढ स्तब्धताही तिला जाणवून जाते.

**सौ. शिरीष पै**